# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik-422 004

**EPABX:** 0253- 2539100/300, **Ph.:** 0253 – 2539191/6659191/291

**Email**: academic1@muhs.ac.in **Website**: www.muhs.ac.in

डॉ. कालिदास द. चव्हाण
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
कुलसचिव

Dr. Kalidas D. Chavan
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
Registrar


जा.क्र. मआविवि/ई-३/२०३४/२०२०

दिनांक ०१/११/२०२०

## परिपत्रक क्र.४१/२०२०

विषय : Academic Online Teacher Database मध्ये महाविद्यालयाने शिक्षकांची माहिती अद्ययावत केल्यानुसार शिक्षक यादी तपासणेबाबत....

विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध कामांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकांची यादी तयार करण्याचे काम विद्यापीठस्तरावर सुरु आहे. त्याकरीता विद्यापीठाने Academic Online Teacher Database (OTD) संगणकीय प्रणाली सर्व महाविद्यालयांकरीता उपलब्ध करुन दिली आहे व वेळोवेळी महाविद्यालयांना सुचना देण्यात आल्या होत्या की त्यांनी महाविद्यालयातील सर्व शिक्षकांची माहिती अद्ययावत ठेवावी जेणे करुन अद्ययावत शिक्षकांची यादी उपलब्ध होईल. तथापि, काही महाविद्यालयांची शिक्षकांची OTD मध्ये अद्ययावत केलेली माहिती आणि स्थानिक चौकशी समिती मार्फत सादर केलेली शिक्षकांची यादी या मध्ये तफावत असल्याचे दिसुन येते.

त्यामुळे विद्यापीठाद्वारे Online Teacher Database वरील महाविद्यालयाने अद्ययावत केलेली शिक्षक यादी व विद्यापीठास स्थानिक चौकशी समितीद्वारे प्राप्त यादी यांची तुलना करुन विद्यापीठाने महाविद्यालयनिहाय विषय निहाय मान्यता प्राप्त शिक्षकांची यादी तयार केली असून या परिपत्रकासोबत जोडलेली आहे. सर्व संबधित महाविद्यालयांनी शिक्षक यादी त्वरीत दि.०९/१२/२०२० पर्यंत तपासुन घ्यावी व त्यामध्ये काही शिक्षकांच्या नावांची नोंदणी करणे अथवा महाविद्यालय सोडून गेलेले/ निवृत्त झालेले/ मयत झालेले शिक्षकांची नोंदणी रदद् करावयाची असल्यास संबंधीत महाविद्यालयाच्या समन्वयक (Co-Coordinator) यांनी सदर माहिती त्वरीत विहित मुदतीत अद्ययावत करावी व सुधारीत यादीची मुद्रितप्रत महाविद्यालयाच्या प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने तात्काळ सादर करावी. ज्या शिक्षकांनी Online Teacher Database मध्ये त्यांची माहिती अद्ययावत केली आहे अश्या शिक्षकांची माहिती विद्यापीठाद्वारे मान्यताप्राप्त शिक्षक यादी मध्ये समाविष्ठ करण्यात येईल, याची नोंद सर्वांनी घ्यावी. विद्यापीठाने विहित केलेल्या दिनांकापर्यंत अद्ययावत करण्यात आलेली शिक्षकांची माहिती ग्राह्य धरण्यात येईल व विद्यापीठाच्या निगडीत विविध कामांसाठी (परीक्षेसाठी) सदर यादीचा उपयोग करण्यात येईल तदनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-
कुलसचिव

(कृ.मा.पहा)

प्रति,
मा.प्राचार्य/अधिष्ठाता,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था
मआविवि, नाशिक.

१) वैद्यकीय,

२) दंत,

३) आयूर्वेद व युनानी,

४) होमीओपॅथी,

प्रत माहीतीस्तवः १) मा.परीक्षा नियंत्रक, मआविवि, नाशिक.
२) अधिष्ठाता, आयुर्वेद व युनानी विद्याशाखा, मआविवि, नाशिक.